वाचले:- १.शासन आदिवासी विकास विभागाकडील निर्णय क्रमांक पोवंशा-
२००२/प्र.क्र.९८/२००२/का.११,दिनांक १० मार्च २००३
२.महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम (सरकारी जमीनींची विल्हेवाट करणे) नियम १९७१ चे नियम ५,६,७
३.मानद सचिव. आदिवासी सेवा सहाय्यक व शिक्षण प्रसारक संस्था नवापुर यांचा अर्ज दिनांक १६/२/२००५
४.म.उपविभागीय अधिकारी नंदुरबार भाग नंदुरबार यांचेकडील पत्र क्रमांक
२००५/गावठाण/कावि.१२९९,दिनांक २०/१०/२००५

---

क्रमांक २००५/ब/कक्ष.२/गावठाण/कावि- ५१३
जिल्हाधिकारी कार्यालय नंदुरबार
नंदुरबार दिनांक:- १/१२/२००५

**आदेश,**

शासन आदिवासी विकास विभागाकडील निर्णय क्रमांक पोवंशा-२००२/प्र.क्र.९८/२००२/का.११, दिनांक १० मार्च २००३ अन्वये आदिवासी सेवा सहाय्यक व शिक्षण प्रसारक संस्था नवापुर यांना मौजे बिलबारा तालुका नवापुर येथे अनुदानित तत्वावर आदिवासी मुलामुलींसाठी आश्रमशाळा चालविण्यास मंजुरी देण्यात आलेली आहे.

मानद सचिव, आदिवासी सेवा सहाय्यक व शिक्षण प्रसारक संस्था, अनुदानित आश्रमशाळा बिलबारा तालुका नवापुर जिल्हा नंदुरबार यांनी मौजे बिलबारा तालुका नवापुर येथील सरकारी ग.न. ३०/१ गुरचरण क्षेत्र ६ हे ७६ आर पैकी अनुदानित आश्रमशाळा बिलबारा या शैक्षणिक संस्थेस इमारत बांधकामासाठी दिनांक १६/२/२००५ चे अर्जान्वये जागा मागणी केली आहे.त्यानुसार तहसिलदार नवापुर यांनी चौकशी करुन म.उपविभागीय अधिकारी नंदुरबार भाग नंदुरबार यांचे मार्फत प्रस्ताव सादर केला असुन जागा मंजुरी बाबत शिफारस केलेली आहे.

मौजे बिलबारा तालुका नवापुर जिल्हा नंदुरबार येथील ग.न.३०/१ क्षेत्र ६ हे .७६ आर पैकी जागा मानद सचिव. आदिवासी सेवा सहाय्यक व शिक्षण प्रसारक संस्था नवापुर , अनुदानित आश्रमशाळा बिलबारा यांना वितरीत करणे बाबत ग्रामपंचायत बिलबारा तालुका नवापुर यांनी दिनांक १८/१/२००४ अन्वये संमतीदर्शक ठराव दिलेला आहे.

तालुका निरीक्षक भुमी अभिलेख नवापुर यांनी मागणी केलेल्या जागेची दिनांक २३/२/२००४ रोजी मोजणी केलेली असुन नकाशा प्रकरणात सामील केलेला आहे.

मौजे बिलबारा तालुका नवापुर येथील ग.न.३०/१ क्षेत्र ६ हे ७६ आर हे ग्रामपंचायत बिलबाराकडे निहीत असल्याने, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम ५१ (१ अ) मला प्रदान करण्यात आलेल्या शक्तीनुसार ग.न.३०/१ क्षेत्र ६ हे ७. आर पैकी **६००० चौ.मी. क्षेत्र मौजे बिलबारा ग्रामपंचायतीकडुन काढुन ,महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम २२ अन्वये सरकारी पडीतात दाखल करुन महाराष्ट्र जमीन महसुल (सरकारी जमीनीची विल्हेवाट करणे ) नियम १९७१ चे नियम ५ व ६ व ८ अन्वये भोगाधिकार मुल्यरहित व सारामाफी शैक्षणिक कामासाठी (शाळा इमारत बांधकामासाठी )या आदेशान्वये खालील अटी व शर्तीवर मंजुर करीत आहे.**

➢ अटी व शर्ती

३.संस्थेस शाळेच्या इमारतीसाठी मंजुर झालेली जमीनीवर इमारतीचे पक्के बांधकाम प्रस्तुत आदेशाच्या दिनांकापासुन किंवा जमीनीचा ताबा घेतल्यापासुन दोन वर्षाचे आत केले पाहिजे

४.संस्थेस जमीन नविन शर्तीने मंजुर केली असल्याने सदर जमीनीचा म.जिल्हाधिकारी यांचे पुर्व परवानगी शिवाय परस्पर गहाण/हस्तांतरण/विक्री अगर तबदील करु नये

५.संस्थेस शैक्षणिक विभागाकडुन सक्षम मान्यता न मिळाल्यास प्रस्तुत आदेश रद्द समजण्यात येतील.

६.तात्पुरता अथवा कायम स्वरुपात ज्या वेळी शासनास उक्त जागेची आवश्यकता असले त्या त्या वेळी संस्था विनाअट जागा शासनाचे ताब्यात देईल.

७.प्रस्तुतचे आदेश कोणत्याही क्षणी विनासुचना मागे घेणे / संस्थेकडुन जमीन काढुन घेणे इत्यादी अधिकारी शासनाने राखुन ठेवलेले आहे.

८.संस्थेने विहीत नमुना नंबर १ मध्ये सनद ३० दिवसाचे आत मंजुर करुन घ्यावी.

९.वरील पैकी कोणत्याही शर्तीचा भंग झाल्यास संस्थेस मंजुर करण्यात आलेली जमीन तिच्या बांधकामासह कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई न देता सरकार जमा करण्यात येईल.

०२/१२/०९

**(जयंत गायकवाड)**
**जिल्हाधिकारी नंदुरबार.**

प्रत:- म.मानद सचिव, आदिवासी सेवा सहाय्यक व शिक्षण प्रसारक संस्था नवापुर तालुका नवापुर

प्रत.- म.उपविभागीय अधिकारी नंदुरबार भाग नंदुरबार यांचेकडेस माहितीसाठी अग्रेषित.

प्रत:- म.तहसिलदार नवापुर यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाही साठी रवाना.

२/- उपरोक्त आदेश बाबत गावचे दप्तरी आवश्यक त्या फेरफार नोंदी घेण्यात याव्यात व दुरुस्त उतारे अवलोकनार्थ सादर करावे. आदेशातील शर्तीचे उल्लंघन होणार नाही या बाबत योग्य ती दक्षता घ्यावी. सोबत मुळ संचिका पानांक १ ते १८९ अभिलेखार्थ परत करण्यात येत आहे.

**जिल्हाधिकारी नंदुरबार करीता.**